# जाहीर नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत पांगारी येथील प्रक्षेत्रावर २५ हजार नग विक्रियोग्य आंबा कलमे तयार करण्याची कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत.

| अ. क्र. | कामाचा तपशिल<br>( कामाचा कालावधी २५ मे २०२३ ते ३१ ऑक्टोबर २०२३) |
|---|---|
| १ | प्लॅस्टीक पिशव्या माती मिश्रणाने भरून पॉली शेड मध्ये वहातुक करून व्यवस्थित लावणे. |
| २ | प्रक्षेत्रावरील मातृवृक्षावरून आंबा अंकुरकाडया काढून आणणे. |
| ३ | आंबा रोपांवर कलमे बांधणे. |
| ४ | वाप्यावरून आंबा वाटा काढून आणणे, स्वच्छ धुऊन निर्जतुक करून कलमे बांधण्यास देणे व बांधलेली कलमे पिशव्यांमध्ये लाऊन पाणी देणे, बांधलेल्या कलमांना आलेली फुट काढणे. |
| ५ | पॉली शेड मधील कलमांना पाणी घालणे, फुट काढणे,फवारणी करणे . |

उपरोक्त प्रमाणे या विभागास २५ हजार नग विक्रियोग्य आंबा कलमे तयार करावयाची आहेत. त्यासाठी साधारण ५0 हजार नग आंबा कलमे बांधून घ्यावयाची आहेत. हे काम ठेका पध्दतीने करावयाचे आहे. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमत्तीपत्र आणि दरपत्रक नमूना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी कामाचे दरपत्रकामध्ये आंबा कलमे बांधणीच्या संपुर्ण कामाचा दर पुर्ण विचार करून नमुद करावा. २५ हजार नग विक्रियोग्य आंबा कलमे निर्मितीचा प्रती कलम दर स्पष्ट नमुद करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमूना पत्रामध्येच भरून द्यावयाचे आहे. आपले दरपत्रक आणि संमतीपत्र या कार्यालयात दिनांक **१०.०५.२०२३** पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहीत दिनांकानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **"पांगारी विभागाअंतर्गत कंत्राटी कामे"** असा उल्लेख करावा, लिफाफा मोहोरबंद करून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली (पांगारी विभाग) यांचे नावे पाठवावा. पोस्टाव्दारे होणा-या विलंबास हे कार्यालय जवाबदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती सोवत जोडण्यात येत असून त्या ठेकेदारास वंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबावत स्वाक्षरी करून दरपत्रकासोवत जोडण्यात याव्यात.

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली.